केंद्र पुरस्कृत योजना

हिंगोली, वाशिम, नंदुरबार व गोंदिया या जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची मंजूर पदे पुनरुज्जीवित करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**

शासन निर्णय क्रमांक : पीटीसी-२०११/(१२६/२०११)/माशि-४

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक :२४ सप्टेंबर,२०१२

**संदर्भ :-** १) अवर सचिव, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.एफ-४/११/२००४-ई ई-९, दि.१६.१२.२००४

२) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे पत्र क्र.मराशैसंप्रप/जिशिप्रस/०४/५२०९, दिनांक २७.१२.२००४

३) शासन निर्णय क्र.पीटीसी-२००५/८/०५/माशि-४, दि.९.८.२००५

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ मध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणाला प्राधान्य देण्यात आले असून, सेवापूर्व व सेवांतर्गत प्रशिक्षण उपलब्ध करुन देण्यावर भर देण्यात आलेला आहे. त्यानुषंगाने केंद्र शासनाने प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याविषयी शिफारस केली होती. त्यानुसार राज्यामध्ये ३३ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था सुरु करण्यात आलेल्या आहेत. हिंगोली, वाशिम, नंदुरबार व गोंदिया या ४ नवीन जिल्ह्यांमध्ये शासन निर्णय क्र.पीटीसी-२००५/८/०५/माशि-४, दि.९.८.२००५ अन्वये जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांची स्थापना करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. सदर शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्ह्यात २६ पदे याप्रमाणे एकूण १०४ पदांचा आकृतीबंध मंजूर करण्यात आला होता. तथापि, या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था प्रत्यक्षात कार्यान्वित करण्यास उशीर झाल्याने सदर १०४ पदे व्यपगत झाली. त्यामुळे सदर पदे पुनरुज्जीवीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

शैक्षणिक वर्ष २००५-०६ पासून हिंगोली, वाशिम, नंदुरबार व गोंदिया या ४ नवनिर्मित जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था स्थापन करण्यास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली होती. या जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थांकरिता केंद्र शासनाने अनुज्ञेय केलेल्या २६ पदांपैकी पुढीलप्रमाणे पदे पुनरुज्जीवित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे :-

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | प्रत्येक संस्थेत २००५ मध्ये निर्माण केलेली पदे | पुनरुज्जीवित पदे |
|---|---|---|---|---|
| १ | प्राचार्य | रु.१५६००-३९१००+६६०० | १ | १ |
| २ | जेष्ठ अधिव्याख्याता | रु.१५६००-३९१००+५४०० | ४ | ४ |
| ३ | अधिव्याख्याता | ९३००-३४८००+४४०० | ६ | ६ |
| ४ | अधिक्षक | ९३००-३४८००+४३०० | १ | १ |
| ५ | लघुलेखक | ९३००-३४८००+४३०० | १ | १ |
| ६ | कार्यशाळा सहायक | ९३००-३४८००+४३०० | २ | २ |
| ७ | तंत्रज्ञ | ९३००-३४८००+४२०० | १ | १ |
| ८ | लेखापाल | ९३००-३४८००+४२०० | १ | १ |
| ९ | ग्रंथपाल | ५२००-२०२००+२८०० | १ | १ |
| १० | सांख्यिकी सहाय्यक | ५२००-२०२००+२८०० | १ | १ |
| ११ | कनिष्ठ लिपिक | ५२००-२०२००+१९०० | ४ | ४ |
| १२ | शिपाई | ४४४०-७४४०+१३०० | ३ | २ |
| | | **एकूण :-** | २६ | २५ |

वरीलप्रमाणे **हिंगोली, वाशिम, नंदुरबार व गोंदिया** या ४ जिल्ह्यांत **प्रत्येकी २५** याप्रमाणे **एकूण १०० पदे पुनरुज्जीवित करण्यात येत असून, सदर मंजूर पदांपैकी चालु आर्थिक वर्षात ६० पदे व पुढील आर्थिक वर्षात उर्वरित ४० पदे भरण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने दिनांक ८ ऑगस्ट, २०१२ च्या बैठकीत मान्यता दिली आहे**. त्यानुसार सदर ४ जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कार्यान्वित करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात मंजूर पदांपैकी अत्यावश्यक १५ पदे याप्रमाणे एकूण ६० पदे भरण्याची तातडीने कार्यवाही करावी. तसेच उर्वरित मंजूर पदांपैकी प्रत्येक जिल्ह्यातील १० पदे याप्रमाणे एकूण ४० पदे पुढील आर्थिक वर्षात भरण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय उच्चस्तरीय सचिव समितीच्या दिनांक ८ ऑगस्ट, २०१२ रोजीच्या बैठक क्रमांक ७१ मधील अनुक्रमांक ६ मध्ये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१२०९२१११५९३३०५०० असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(अ.अ.गावडे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
मा.मंत्री/ राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
शिक्षण संचालक ( प्राथमिक / माध्यमिक ) महाराष्ट्र राज्य, पुणे
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली, वाशिम, नंदुरबार व गोंदिया.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
संबंधित कोषागार अधिकारी,
वित्त विभाग (वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक (लेखा व कोषागारे). संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती, माशि-४